# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 14/10/2023 (शनिवार) दुपार


### गोंडखैरी पारधी बेडा येथील अवैध्य दारू भट्टीवर छापे एकुण ११,७५,८८८/—रूपयाचा मुद्देमाल जप्त, कळमेश्वर पोलिस स्टेशन व स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांची संयुक्त प्रतिबंधक कारवाई

दिनांक १४/१०/२०२३ रोजी पोस्टे कळमेश्वर हद्दीतील गोंडखैरी येथील पारधी बेडा येथे मोठया प्रमाणावर अवैध गावठी दारू तयार करून आजुबाजुचे परिसरात विक्री करणार असल्याची गोपनीय खबर कळमेश्वर पोलिसांना मिळाल्याने मा. पोलिस अधीक्षक श्री हर्ष ए. पोद्दार, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. डॉ. संदिप पखाले, पोलीस उपविभागीय पोलिस अधिकारी सावनेर श्री अजय चांदखेडे यांचे मार्गदर्शनाखाली, स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण येथील पोलिस निरीक्षक श्री ओमप्रकाश कोकाटे तसेच पोलिस स्टेशन कळमेश्वर चे प्रभारी अधिकारी श्री. सोळसे, पोलीस निरीक्षक दाबेराव यांचे नेतृत्वाखाली आज दि. १४/१०/२०२२ रोजी पोलिस स्टेशन कळमेश्वर हद्दीतील गोंडखैरी पारधी बेडा येथे सुरू असलेल्या अवैध दारू भट्टीवर छापे मारून एकुण किंमती ११,७५,८८८/—रूपयाचा मुद्देमाल जप्त करून एकुण १४ आरोपीतांवर पोलिस स्टेशन कळमेश्वर येथे गुन्हे दाखल करण्याची प्रक्रीया सुरू आहे. कारवाई दरम्यान एकुण ७७४२ लिटर कच्चे रसायन सडवा, ४०० लिटर गावठी तयार दारू व दारू तयार करणेकामी लागणारे साहीत्य जप्त करून गावठी दारूच्या भट्टया उद्धवस्त करण्यात आल्या आहे.

सदरची कारवाईसाठी पोलीस स्टेशन कळमेश्वर येथील सहायक पोलीस निरीक्षक मेश्राम, पोटभरे, पोलीस उपनिरीक्षक टिपले, व २० अंमलदार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे, सहायक पोलीस निरीक्षक राजीव कर्मलवार, पोलीस उपनिरीक्षक आशिष मोरखेडे व २२ अंमलदार पोलीस मुख्यालय येथील आर सी. पी पथक, क्यु. आर. टी. पथक, पोलीस स्टेशन सावनेर येथील ०१ अधिकारी ०५ अंमलदार, पोस्टे केळवद येथील ०३ अंमलदार, पोस्टे खापा येथील ०३ अंमलदार असे संयुक्तिकपणे पार पाडली.



## जिवानाशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीतांना अटक

पो.स्टे. पारशिवनी :– अंतर्गत ०३ कि. मी अंतरावर मौजा पालोरा येथे दिनांक १३/१०/२०२३ चे १३.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे– रितेश माधवराव कामडे, वय ३० वर्ष, रा. पालोरा ता. पारशिवनी याचा पुतण्या जखमी नामे– चेतन गजानन कामडे, वय २१ वर्ष, रा. पालोरा यांनी आरोपीच्या घराच्या बाहेर जाऊन आरोपींना आम्हाला शिवीगाळ का करतो असे म्हणुन हटकले असता आरोपी क्र. ०१ यांनी फिर्यादी व फिर्यादिचे पुतण्याची गच्ची पकडुन तुम्हाला दाखवु का असे म्हणुन **आरोपी नामे–१) प्रदिप धनराज कामडे वय ४७ वर्ष २) उमेश प्रदिप कामडे वय १९ वर्ष दोन्ही रा. पालोरा ता. पारशिवनी** यांनी संगणमत करूण शिवीगाळ केली व आरोपी क्र. ०२ याने फिर्यादिचे पुतण्याला जिवे मारण्याचा उद्देशाने पाठीमागुन येउन त्याचा कमरेखाली डाव्या पुष्ठावर सतुरने वार करून गंभीर जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीतांविरूद्ध कलम ३०७, ५०४, ३४ भा.द.वी अन्वये गुन्हा नोंद केला आहे. यातील आरोपीतांना अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक राहुल सोनवणे पोस्टे पारशिवनी मो. नं. ७०२०५७७४५९ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर